प्रेसनोट दिनांक १९/०७/२०१९

## समर्थ पोलीस स्टेशन पुणे

### महिलेच्या हातामधील मोबाईल जबरदस्तीने हिसकावून पळून जाणा�या आरोपीस अटक

समर्थ पोलीस ठाणे हद्दीमध्ये एच.डी.एफ.सी. बँकेमध्ये काम करणाऱ्या महिला नामे- मोनिका गोसावी वय २३ वर्षे, रा- धायरी पुणे ह्या नेहमीप्रमाणे दिनांक १८/०७/२०१९ रोजी नोकरीवर जाण्यासाठी पीएमपीएल पुणे स्टेशन बसने राहते ठिकाणाहून पुणे स्टेशन आंबेडकर पुतळा मंगळवार पेठ पुणे येथे सकाळी ०८:०० वा. चे सुमारास आल्या होत्या. तेथे बसमधून उतरुन पायी चालत जुनी जिल्हा परिषद चौक, पुणे येथील उतारावरुन सरळ पुढे नरपतगिरी चौकाच्या दिशेने मोबाईलवर बोलत जात असताना अचानक पाठीमागून एक अनोळखी इसम आला व त्याने मोनिका गोसावी यांच्या हातातील मोबाईल हँडसेट जबरदस्तीने हिसकावून पळून जावू लागला, तेव्हा मोनिका हिने घाबरुन जोरजोराने चोर चोर असे ओरडल्यामुळे सदर भागात पेट्रोलिंग करणारे समर्थ पोलीस स्टेशनचे तपासपथकाचे पोलीस कर्मचारी पोशि निलेश साबळे, पोशि अनिल शिंदे यांनी स्थानिक नागरीकांच्या मदतीने मोबाईल हिसकावून पळणाऱ्या इसमाचा पाठलाग केला. त्यास थोड्याच अंतरावर नागरीकांनी पकडले. व समर्थ पोलीस स्टेशन येथे आणले त्यावेळी पोलीसांनी मोबाईल चोरट्यास त्याचे नाव व पत्ता विचारता त्याने त्याचे नाव रेहान ऊर्फ अकिल इस्लामुद्दीन मलिक रा- नोएडा, नवी दिल्ली असे असल्याचे सांगितले.

त्यामुळे मोनिका गोसावी यांनी त्यांचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावून चोरुन घेवून जाणारा इसम नामे- रेहान ऊर्फ अकिल इस्लामुद्दीन मलिक रा- सेक्टर नंबर-५२, भाजी मंडई, नोएडा, नवी दिल्ली सध्या रा. बुडनवाडी, संत कबीर चौक जवळ, नानापेठ पुणे याचेविरुध्द तक्रार दिल्याने समर्थ पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीनुसार गुन्हा रजिस्टर नंबर- २१३/२०१९ भा.द.वि. कलम- ३९२ अन्वये नोंद करुन आरोपी- अकिल मलिक यास गुन्ह्यात अटक करुन त्याचेकडून फिर्यादी यांचा चोरलेला रेडमी कंपनीा ५०००/- रुपये किंमतीचा मोबाईल हॅण्डसेट पोलीसांनी जप्त करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे. सदरची कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. बाळकृष्ण कदम व पोलीस निरीक्षक गुन्हे श्री. विनायक साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस फौजदार ए.डी. रणपिसे, मपोशि सुरेखा शिंदे, पोशि अनिल शिंदे व पोशि निलेश साबळे यांनी केलेली असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री.प्रभाकर कापुरे हे करीत आहेत.